## आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.02.2025** **वार- मंगळवार**

---

मंत्रीमंडळ

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातल्या पौड इथे लिंक कोर्ट ऐवजी कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाची स्थापना करण्यास आज राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. याशिवाय बारामती इथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास आणि त्याकरता 564.58 कोटी रुपयांच्या निधीलाही मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

रांजणगाव

पुणे जिल्ह्याच्या शिरुर तालुक्यातील रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीतील - वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन - जलजीवन मिशनअंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणीपुरवठा योजना तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज संबंधित अधिकारी आणि यंत्रणांना दिल्या. रांजणगावची भविष्यातील गरज ओळखून ग्रामपंचायत परिसरात मोठ्या क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समिती, स्वच्छ भारत मिशनमधून निधी देण्यात येईल, त्यासोबत ग्रामपंचायतीच्या वाट्यासह 'सीएसआर' निधी उभारण्याच्या सूचना त्यांनी जिल्हाधिकारी यांना दिल्या.

आयएटी

भारतीय अवकाश विभागाचे माजी सचिव आणि अंतराळ आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. के. सिवन यांना पुण्यातल्या एआयटी संस्थेच्या 31 व्या स्थापना दिनानानिमित्त आज झालेल्या कार्यक्रमात जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. सिवन हे आंतरराष्ट्रीय ॲस्ट्रोनॉटिक्स अकादमी IAA चे उपाध्यक्ष आहेत. त्यांनी ॲस्ट्रोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया ASI चे अध्यक्ष म्हणूनही काम केलं असून . त्यांच्याच अध्यक्षतेखाली इस्त्रोने 22 जुलै 2019 रोजी चंद्रावरील चांद्रयान-2 मोहीम आखली. .

पुरस्कार

‘राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती’तर्फे दिलं जाणारा यंदाचा ‘पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार’ राजस्थानमधील ‘गोयल ग्रामीण विकास संस्थान’ आणि भारतीय हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक पी. आर. श्रीजेश यांना जाहीर करण्यात आला आहे. १ मार्च रोजी पुण्यात बालगंधर्व इथे होणाऱ्या कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान केले जातील. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर उपाख्य श्रीगुरुजी यांच्या जयंतीदिनानिमित्त हा पुरस्कार दिला जातो. या राष्ट्रीय पुरस्काराचे यंदा 30 वे वर्ष आहे.

शाळा

पुणे महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांचं प्रशिक्षण घेतलं जाणार आहे. त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय शिक्षण परिषदेचं आयोजन केलं जाईल. त्यानंतर जर गुणवत्ता घसरली तर शिक्षकांची जबाबदारी निश्चित करण्यात येईल असं पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी म्हटलं आहे.

इयत्ता ६वी ते ८वीच्या ४० टक्के विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना भागाकार करता येत नाही, सरकारी शाळांमधील प्रवेश संख्या घटली आहे, मुलांचा स्मार्टफोनचा वापर वाढला आहे असे निरीक्षणे नोंदविली गेली आहेत.

अन्नप्रक्रिया

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत 22 हजार 10 प्रकल्पांना मंजुरी मिळाली असून, देशात महाराष्ट्र राज्याने अन्न प्रक्रिया उद्योगात अव्वल स्थान पटकावले आहे. अशी माहिती पीएमएफएमई प्रकल्पाचे राज्याचे नोडल अधिकारी आणि राज्याचे प्रक्रिया – नियोजन कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी दिली. राज्यात आत्तापर्यंतच्या एकूण मंजूर प्रकल्पांपैकी 15 हजार प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत

.

विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ‘उत्कर्ष 2025’ चं सर्वसाधारण विजेतेपद पुन्हा एकदा पटकावलं आहे. पुणे विद्यापीठाचा जगन्नाथ शिंदे हा यंदाच्या ‘उत्कर्ष’चा ‘गोल्डन बॉय’ ठरला, तर पुणे विद्यापीठाची अंजली जाधव हिने ‘गोल्डन गर्ल’चा किताब पटकावला. सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संघाने स्पर्धेचं उपविजेतेपद पटकावले.

जेई

जापनीज एन्सेफ्लॅयटीस अर्थात 'जेई' प्रतिबंधक लसीकरण मोहीम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे 1 मार्च पासून राबविण्यात येणार आहे. जेई' हा विषाणूजन्य आजार प्रामुख्याने 15A वर्षांखालील मुलांना होतो. या आजारामुळे गंभीर मज्जातंतू विकार होण्याची शक्यता असते, तसंच याचा मृत्यूदरही सुमारे 30 टक्के आहे, आणि 30-40 टक्के

बरे झालेल्या मुलांमध्ये मज्जातंतूशी संबंधित अपंगत्व आयुष्यभर राहते. त्यामुळे या आजारापासून बचावासाठी लसीकरण करण्याचं आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे करण्यात आलं आहे.

कुमारगंधर्व

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे उद्या संध्याकाळी पाच वाजता पंडित कुमार गंधर्व महोत्सवाचा आयोजन पुण्यातल्या बालशिक्षण एमएस सभागृहात करण्यात आला आहे. कुमार गंधर्वांची गायकी याविषयी पंडित कुमार गंधर्व यांचे ज्येष्ठ शिष्य पंडित सत्यशील देशपांडे प्रात्यक्षिकांसह सादरीकरण करणार आहेत. विदुषी साने या पाटणकर यांचं गायन होणार असून पुष्कर लेले पंडित कुमार गंधर्व यांच्या निर्गुणी भजनाविषयीची वैशिष्ट्य गायनातून सादर करणार आहेत.

हवामान

उद्या पुणे आणि परिसरात कमाल 35 तर किमान 15 अंश सेल्सिअस तापमान राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.